शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.०४/२०२१

श्री.तबरेज फैय्याज मुजावर } तक्रार अर्जदार

विरूध्द्

१. जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा.

२. डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ.दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग,कराड, जि.सातारा. } वि.प.

जी.के.गुजर मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट, कराड, जि. सातारा यांचे डॉ.अशोक गुजर टेक्नि.इन्सि. डॉ. दौलतराव आहेर कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, कराड, जि.सातारा. यांचेकडील सहा. प्राध्यापक श्री. तबरेज फैय्याज मुजावर यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.०६/०४/२०२१ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार पुढील प्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

मी, सदर महाविद्यालयात दि.०१/०७/२०१४ पासून सहा. प्राध्यापक पदावर सलगपणे सेवा करत आहे. मात्र एप्रील २०२०, जून २०२०, ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२० व डिसेंबर २०२० या पाच महिन्यांचे पगार मी वारंवार विनंती करूनही अदा केलेले नाहीत. शिवाय फेब्रवारी २०२१ या महिन्याचा महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा पगार व्यवस्थापनाने अदा केला आहे. मात्र मला वेतन अदा केलेले नाही. महत्वाचे म्हणजे मला शासन दराने मुळ पगार व भत्ते देणे ही व्यवस्थापनाची जबाबदारी असताना देण्यात आलेला पगार आणि भत्ते शासन दरापेक्षा खुपच कमी आहेत. त्यामुळे मला दि.०१/०७/२०१४ पासून सहाव्या वेतन आयोगातील दराप्रमाणे वेतन अदा करण्याचे आदेश व्हावेत. तसेच इथून पुढचा पगार ७ व्या वेतन आयोगातील शिफारशी प्रमाणे राष्ट्रीयकृत बॅंकेत व्हावा हि विनंती.

**महाविद्यालयाचा अभिप्राय :**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे महाविद्यालये हि एप्रील २०२० ते जाने. २०२१ हया कालावधीमध्ये बंद होती. या कालावधीमध्ये आम्ही एकाही शिक्षकाला महाविद्यालयामध्ये बोलावले नाही व घरूनच ऑनलाईन लेक्चर

घेण्यास सांगितले. सदर कालावधीमध्ये समाजकल्याण कडून निधी मिळाला नाही. तसेच विद्यार्थ्यांची फी पुर्णपणे जमा झाली नाही व प्रवेश सुध्दा ४० टक्केच्या आसपास झाले. महाविद्यालय आर्थिक अडचणीत असताना देखील ५० टक्के पगार सगळयांना देण्यात आला आहे. तसेच तक्रारदाराला विभागप्रमुखांनी दिलेली कामे बऱ्याच वेळा सांगून केली नसल्यामुळे फेब्रुवारी २१ चा पगार स्थगित ठेवण्यात आला आहे.

**संस्थेचा अभिप्राय :**

वरील तक्रारीसंबधांत अर्जदाराला सर्व आर्थिक बाबी समजून सांगितल्या आहेत. फेब्रवारी २०२१ चा पगार का स्थगित केला आहे ह्याची कल्पना दिलेली आहे. तसेच काम अपुर्ण असलेबद्दलचे शो कॉज नोटीस देखील त्यांना त्याच्या अगोदर पाठविली आहे.

**समितीची निरिक्षणे :**

१. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात महाविद्यालयाने एप्रील २०२०, जून २०२०, ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२० व डिसेंबर २०२० या पाच महिन्यांचे पगार तसेच फेब्रवारी २०२१ या महिन्याचे वेतन अदा केलेले नाही अशी तक्रार नमूद केली आहे.

समितीसमोर तक्रारदार यांनी तक्रारीमध्ये नमूद केलेले थकीत वेतन महाविद्यालयाकडून आपणास अदा करण्यात आल्याचे कथन केले तसेच याबाबतचा लेखी अर्ज सादर केला. सबब तक्रारदार यांना तक्रारीमध्ये नमूद केलेले थकीत वेतन त्यांना प्राप्त झालेले असल्याने सदर मुद्या समितीकडून निकाली काढणेत येत आहे.

२. तक्रारदार यांनी तक्रार अर्जात आपणास शासन दराने मुळ पगार व भत्ते देणे हि व्यवस्थापनाची जबाबदारी असताना देण्यात आलेला पगार आणि भत्ते शासन दरापेक्षा खुपच कमी आहेत. त्यामुळे दि.०१/०७/२०१४ पासून सहाव्या वेतन आयोगातील पगाराप्रमाणे वेतन देण्याचे आदेश व्हावेत अशी तक्रार नमूद केली आहे.

याबाबत तक्रारदार यांनी दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये सदर अभियांत्रिकी महाविद्यालय हे शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असून शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरूनी दि.०९/१०/२००९ रोजी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ च्या कलम १४(८) खाली महाराष्ट्र शासनाचा दि.१२/०८/२००९ रोजीचा उच्च शिक्षण विभागाकडील शिक्षकांच्या वेतन पुर्नरचनेचा निर्णय विद्यापीठाशी सर्व संलग्न महाविद्यालयाना लागू केला असून सर्व महाविद्यालयामध्ये सदर आदेशाची अंमलबजावणी दि.०१/०१/२००६ पासून करण्याबाबत आदेश दिले आहेत. मा. कुलगुरूंचा सदर आदेश शिवाजी विद्यापीठाचे संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांनी दिनांक दि.२९/१०/२००९ रोजीच्या पत्राव्दारे सर्व संलग्न महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांना कळविला आहे. मे.सुप्रिम कोर्टाने दि.०५/०१/२०१७ रोजी दिलेला सेक्रेटरी महात्मा गांधी मिशन व इतर वि. भारतीय कामगार सेना व इतर २०१७ (१) ऑल एम.आर.९४७ (एस.सी) या केसच्या निर्णयामध्ये

खालील निर्देश दिलेले आहेत 69 While the G.R. dated 12/08/2009 is specific in its declaration that the elaborate rules contained therein dealing with the pay scales of various orders of the teaching staff of the educational institutions mentioned therein, it does not make any distinction between aided and un-aided colleges. या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद बेंच यांनी याचिका क्र. ११०९१/२०१० मध्ये कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना दि. ०१/०१/२००६ पासून ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याबाबत दिलेला निर्णय कायम झाला आहे. तसेच मे.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र. ७९७/२०१७ मध्ये त्याच निर्णयाची पुनरावृत्ती केलेली आहे. शिवाय मे. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद बेंच यांनी याचिका क्र. ५१५०/२०१३ किरण माणिकराव भुसारे व इतर विरूध्द् स्टेट ऑफ महाराष्ट्र राज्य व इतर यामध्ये दि. १५/०१/२०१८ रोजी विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षकांना दि. ०१/०१/२००६ पासून ६ वा वेतन आयोग लागू करण्याबाबत आदेश दिलेले आहेत. या सर्व न्यायनिर्णयांचा विचार करता यातील तक्रारदारास नेमणूक दिनांकापासून सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे व दि.०१/०१/२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगातील दराने वेतन मिळावे अशी मागणी केली आहे.

संस्था व महाविद्यालयाने दिलेल्या लेखी खुलाश्यामध्ये श्री. मुजावर यांना वेतन त्यांच्या वेतन श्रेणीनुसार अदा केलेले आहे. परंतू, श्री.मुजावर यांना शासनाप्रमाणे वेतन मागण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वेतन ठरविण्याचा व महागाई भत्ता किती द्यायचा याचा अधिकार व्यवस्थापनाचा आहे. त्यामुळे श्री.मुजावर यांना दिलेले वेतन योग्य आहे. त्यामुळे मुजावर यांची मागणी चुकीची असल्याचे म्हटले आहे.

दोन्ही पक्षकारांनी समितीसमोर सादर केलेले लेखी म्हणणे अवलोकनी घेता समितीचे मत असे की, संस्था व महाविद्यालयाने दिलेला उपरोक्त चा लेखी खुलासा हा समाधानकारक नसल्याचे दिसून येते. महाविद्यालयास विद्यापीठ/शासन/एआयसीटी यांचेकडून परवानगी देत असताना, शासन/विद्यापीठ यांनी वेळोवेळी केलेल्या नियमानुसार महाविद्यालयातील शिक्षकांना वेतन व भत्ते देण्यात येतील असे लेखी हमीपत्र संस्था, महाविद्यालय यांनी सादर केलेले असते त्यामुळे त्याचे पालन करणे ही सर्व महाविद्यालयांची जबाबदारी असून ती नाकारता येणार नाही. विद्यापीठाचे नियम हे संस्था व महाविद्यालयांवर बंधनकारक आहेत.

तक्रारदार नेमणूक दिनांकापासून ते अर्ज दाखल तारखेपर्यंत म्हणजेच ६ एप्रील २०२१ पर्यंत वेतन घेत होते. ते वेतन पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे होते याबद्दल कोणाचाही उज्र नाही. दि.०१/०१/२००६ पासून कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन देण्याचा निर्णय लागू झालेला असून त्या प्रमाणे आपल्या सर्व कर्मचाऱ्यांना वेतन देणे ही संस्था, महाविद्यालय यांची जबाबदारी आहे. विद्यापीठाचे नियम हे संस्था व महाविद्यालयांवर बंधनकारक आहेत. सबब दि.०१/०७/२०१४ पासून सहाव्या वेतन आयोगाच्या तक्रारदार यांच्या पदनामास लागू

असणाऱ्या शिफारशीनुसार वेतन व त्यावरील देय भत्ते मिळण्यास तक्रारदार पात्र आहेत. सुधारीत वेतनश्रेणीप्रमाणे देय असणारे वेतन आणि भत्ते देण्याची कायदेशीर जबाबदारी संबधित संस्था व महाविद्यालयांवर असते व तशी सुधारीत वेतनश्रेणी व देय भत्ते मिळण्याचे कायदेशीर हक्क शिक्षक/कर्मचाऱ्यास निर्माण होतात. तथापि तशी मागणी तक्रारदाराने तक्रार दाखल तारखेपर्यंत केल्याचे दिसून येत नाही. हक्क जरी निर्माण झाला असला तरी तो हक्क विहीत मुदतीत बजावावा लागतो अन्यथा त्या हक्काची अंमलबजावणी करण्याचा अधिकार मुदतीच्या कायद्याने नष्ट होतो. प्रस्तूत प्रकरणातील तथ्यांचा विचार करता तक्रारदारास तक्रार दाखल करण्यापुर्वी तीन वर्षापासून प्रत्यक्ष अदा केलेले वेतन व भत्ते तसेच सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार त्यांना लागू झालेल्या दिनांकापासून देय असणारे वेतन व भत्ते यातील फरक मिळण्यास पात्र आहे.

दि.२८/०२/२०२३ च्या तक्रारदाराच्या लेखी निवेदनाप्रमाणे तक्रार अर्जात नमूद केलेला थकीत पगार जानेवारी २०२३ मध्ये ६४ टक्के महागाई भत्त्यानुसार त्यास मिळालेला आहे. तक्रारदाराने माहे एप्रील २०२०, जून २०२०, ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२० व डिसेंबर २०२० तसेच फेब्रवारी २०२१ चा पगार त्यास अदा केलेला नाही अशी तक्रार मांडलेली होती. सदरच्या वेतनाची थकबाकी त्यास जानेवारी २०२३ मध्ये ६४ टक्के महागाई भत्त्यानुसार मिळाली आहे असे तक्रारदाराने लिहून दिलेले आहे. सबब थकीत वेतनाची मागणी समितीस मान्य करता येत नाही. तथापि तक्रारदारास अदा करण्यात आलेले थकबाकी वेतन सहाव्या वेतन आयोगाच्या वेतन शिफारीशीनुसार दिलेले नसेल तर त्या शिफारशीनुसार देय असणारे वेतन व भत्ते आणि तक्रारदारास प्रत्यक्षात दिलेले वेतन आणि भत्ते यातील फरकाची रक्कम संस्था व महाविद्यालयाने देणे क्रमप्राप्त आहे.

३. तक्रारदार यांनी तक्रार अर्जामध्ये ७ व्या वेतन आयोगातील शिफारशी प्रमाणे राष्ट्रीयकृत बॅंकेत वेतन व्हावे अशी मागणी नमूद केली आहे.

या तक्रारीच्या अनुषंगाने समितीने, शिवाजी विद्यापीठाशी सलंग्नित विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांना सातवा वेतन आयोग लागू आहे काय तसेच शासनाकडून याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत काय याची विद्यापीठाच्या सलंग्नता टी १ विभागाकडून माहिती घेतली असता उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडून विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयांतील शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी आदेश निर्गमित करण्यात आलेला नसल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयातील शिक्षकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला नाही असे कळविले आहे. त्यामुळे तक्रारदार यांची मागणी समितीस मान्य करता येणार नाही.

सबब प्रस्तूतची तक्रार अशंतः मंजूर करावी लागेल असा या समितीचा निष्कर्ष आहे. करिता समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

तक्रारदार यांची तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

१. तक्रारदार यांची माहे एप्रील २०२०, जून २०२०, ऑगस्ट २०२०, ऑक्टोंबर २०२० व डिसेंबर २०२० तसेच फेब्रुवारी २०२१ या महिन्यांच्या थकित वेतनाची मागणी निकाली काढणेत येत आहे.

२. तक्रारदार यांची सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन मिळण्याची मागणी माहे एप्रील २०१८ पासून मान्य करण्यात येत आहे. संस्था व महाविद्यालयाने सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार माहे एप्रील २०१८ पासून तक्रारदारास देय असणारे वेतन व भत्ते आणि तक्रारदारास त्या तारखेपासून प्रत्यक्ष अदा केलेल्या वेतन व भत्यामधील फरक हा आदेश प्राप्त झालेल्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत त्वरीत अदा करण्यात यावा.

३. तक्रारदार यांची सातव्या वेतन आयोगानुसार वेतन मिळण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधितांना देऊन तसे कळविण्यात यावे.

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

दिनांक : 06 APR 2023

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री. एस.यु.शिंदे)

सदस्य
(डॉ.एस.एस.महाजन )

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम )

अध्यक्ष
(श्री.ए.व्ही.देशपांडे)

Ankalekar
सदस्य
(डॉ. ए. एच. कोलेकर)

(प्रा. हंगिरगेकर एम. पी.)